☎ (02452) 229755; EPABX Lines 223801-223803 Extn.407,405,413
Fax No. 229755; Gram - University
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र) भारत
Vasantrao Naik Marathwada Agricultural University
Parbhani-431 402 (Maharashtra) India

जा.क्र.-प्रवेश-२०२२/प्र.क्र.०४/विद्या-१०(ब)
दिनांक :१८.०१.२०२२

प्रति,
प्राचार्य,
घटक कृषि तंत्र विद्यालय,
अंबाजोगाई, औरंगाबाद, जालना,
नांदेड, परभणी, लातुर

**विषयः- कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२१-२२ मधील पाचवी प्रवेश फेरी राबविणे बाबत.**

संदर्भः- सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) यांची टिपणी क्रमांक जीआयई/२०२२/०९ दिनांक १७.०१.२०२२

उपरोक्त संदर्भाधिन विषयी कळविण्यात येते की, निम्नस्तर कृषि शिक्षणांतर्गत प्रथम वर्ष कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये १७ टक्के जागा रिक्त राहिलेल्या असून काही विद्यालयांनी रिक्त जागा भरण्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे पाचवी प्रवेश फेरी राबविण्यात येत आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी रिक्त जागेवरील प्रवेशासाठी संबंधीत विद्यालयात प्रवेश कार्यक्रमानुसार प्रवेश घ्यावा. सदर पाचव्या प्रवेश फेरीत रिक्त जागानुसार संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा दिनांक १८.०१.२०२२ ते २४.०१.२०२२ दरम्यान राहणार असून सोबतच्या परिशिष्ठ - ०१ नुसार प्रवेश प्रक्रिया कार्यपध्दती राबविण्यात यावी. तसेच या प्रवेश फेरीत अंतीम गुणवत्ता यादीतील प्रवेश न घेतलेले तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील रहिवासी विद्यार्थी पात्र असणार आहेत.

तसेच सदर प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणे ऑफलाईन व ऑनलाईन या मिश्र पध्दतीनेच राहणार असून अधिनिस्त सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालयांना या प्रवेश फेरीची जाहीर प्रगटन हे विभागीय/जिल्हास्तरीय दैनिक वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याच्या सुचना देण्यात याव्या. रिक्त जागांचा तपशिल वर्गवारीनुसार विद्यालय निहाय विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात येत आहे.

सोबतः १. सुधारित प्रवेश कार्यक्रम, २०२१-२२
२. परिशिष्ठ - १

(ग.अ.भालेराव)
उपकुलसचिव (विद्या)

**प्रतिलिपीः**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी
२. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी यांना सदरील पत्राची प्रत देऊन संबंधीतास योग्य कार्यवाही करण्याबाबत अवगत करावे.

**प्रतः**

१. प्रभारी अधिकारी, मध्यवती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देऊन सुचित करण्यात येते की, सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२. मा.कुलगुरु महोदय, वनामकृवि, परभणी यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.

## सुधारीत वाढीव प्रवेश कार्यक्रम २०२१-२२

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ संकेतस्थळावर विद्यालयनिहाय रिक्त जागांचा तपशील प्रसिध्द करण्याचा दिनांक | १८-०१-२०२२ |
| २ | संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज (रू.४००/- अराखीव वर्गवारीसाठी व रू.२००/- राखीव प्रवर्गासाठी) दाखल करण्याचा कालावधी | १८-०१-२०२२ ते २४.०१.२०२२ |
| ३ | नव्याने प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांची छाननीनंतर सर्व साधारण गुणवत्ता यादी संकेस्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक | २८.०१.२०२२ |
| ४ | रिक्त जागेप्रमाणे ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाच्या आहे अशा विद्यालयात मुळ प्रमाणपत्रे व आवश्यकत्या शुल्कासह उमेदवारांने उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा दिनांक | ३१.०१.२०२२ |
| ५ | रिक्त जागेनुसार वरील कालावधीत प्रवेशीत उमेदवारांच्या यादीस जिल्हयातील घटक विद्यालयाच्या प्राचार्यांनी पडताळणी करून प्रवेशास मान्यता देण्याचा कालावधी | ०१-०२-२०२२ |
| ६ | मान्यता यादीनुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांना संबधीत विद्यालयात उपस्थित राहून वर्ग सुरू होण्याचा दिनांक | ०३-०२-२०२२ |
| ७ | विहीत नमुन्यातील अंतिम प्रवेश याद्या विद्यापीठास संबधीत सर्व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह सादर करण्याचा दिनांक | १४-०२-२०२२ |

(ग. अ. भालेराव)
**उपकुलसचिव (विद्या)**

# परिशिष्ठ-१

**या वाढीव प्रवेश फेरीसाठी प्रवेश मार्गदर्शक नियम / सुचना खालील प्रमाणे राहातील.**

१. प्रवेश अर्ज भरण्याची पध्दती व जोडावयाची प्रमाणपत्रे याबाबत सविस्तर माहिती प्रवेश माहिती पुस्तिकेत दिलेली आहे. प्रवेश अर्ज भरण्यापुर्वी विद्यार्थ्यांनी प्रवेश माहिती पुस्तिका वाचावी.

२. या प्रवेश फेरीची प्रवेश प्रक्रिया प्रत्येक विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रिया केंद्रात राबविण्यात येईल. प्रवेश इच्छूक विद्यार्थ्यांनी रिक्त जागेवरील प्रवेशासाठी संबंधीत विद्यालयात प्रवेश कार्यक्रमानुसार उपस्थित राहून प्रवेश घ्यावा लागेल. या प्रवेश फेरीनंतर प्रवेश देण्यास विद्यालयांना अनुमती देण्यात येणार नाही.

३. या प्रवेश फेरीसाठी कुलसचिव यांचे पत्र क्र.प्रवेश-२०२०/प्र.क्र.०१/विद्या-१०(ब) दिनांक २१-१०-२०२० अन्वये जिल्हा बंदीची अट शिथील असेल तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राच्या बाहेरील विद्यार्थ्यांसाठी विभाग बंदीची अट शिथील असेल. सबब, महाराष्ट्रातील सर्वच विद्यार्थी प्रवेशास पात्र असतील.

४. चालु शैक्षणिक वर्षातील सर्वसाधरण गुणवत्ता यादीतील प्रवेश प्रक्रियेत ज्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नसेल ते विद्यार्थी देखील प्रवेशास पात्र असतील. परंतू रिक्त जागेनुसार व गुणवत्तेनुसार त्यांना प्रवेश घ्यावा लागेल.

५. चालु शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेत जे विद्यार्थी त्रुटीमुळे प्रवेशास पात्र होऊ शकले नाहीत त्यांना ही पुन्हा नव्याने परिपुर्ण प्रवेश अर्ज सादर करावा. नव्याने अर्ज केल्यानंतरच हे विद्यार्थी या वाढीव फेरीसाठी पात्र होऊ शकतील. परंतू रिक्त जागेनुसार व गुणवत्तेनुसार त्यांना प्रवेश घ्यावा लागेल

६. प्रवेशाच्या दिवशी सकाळी ९ ते १२ या कालावधीत प्रवेश यादीतील (पुर्वीच्या व वाढीव फेरीतील )विद्यार्थ्यांनी संबंधीत कृषि तंत्र विद्यालयात उपस्थित राहून नोंदणी करावी. व त्यांनतर दुपारी रिक्त जागा नुसार व गुणवत्तानूसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाची नोंद ऑनलाईन प्रमाणपत्रे पडताळणी नंतर लगेच करण्यात यावी. प्रवेशासाठी संबंधीत संस्थांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश पत्र काढून घ्यावेत.

७. रिक्त जागा भरतांना नियमाच्या अधिन राहून रिक्त जागा भराव्यात. अवैध प्रवेश होणार नाहीत याची संबंधीत संस्थाच्या प्राचार्यानी दक्षता घ्यावी.

८. प्रवेश पुस्तीका २०२१-२२ मधील प्रवेश पात्रता व इतर सर्व मार्गदर्शक नियम या फेरीस देखील लागु रहातील.

९. या प्रवेश फेरीची जाहीर प्रगटन हे विभागीय / जिल्हास्तरीय दैनिक वर्तमानपत्रातून संबंधीत खाजगी संस्थामार्फत करण्याचे प्रस्तावीत आहे. विद्यापीठस्तरावर केवळ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर याबाबत माहिती देण्यात येईल.

(ग.अ.भालेराव)
उपकुलसचिव (विद्या)